# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**मंगळवार, दिनांक १६ जुलै, २०१३**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : अभिनंदनपर प्रस्ताव :-**

"उत्तराखंडातील नुकत्याच ओढवलेल्या भीषण नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदतकार्यामध्ये स्वत:चा जीव धोक्यात घालून, भारतीय संरक्षण दलाच्या अधिकारी व जवानांनी अत्यंत कठीण परिस्थितीत व प्रतिकूल हवामानामध्ये एक लाखापेक्षा जास्त यात्रेकरू व नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी केलेल्या धाडसी, अतुलनीय व साहसपूर्ण कामगिरीबद्दल अभिनंदनपर प्रस्ताव."

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री जितेंद्र आव्हाड,** विलास लांडे, लक्ष्मण जगताप, बापूसाहेब पठारे, किसन कथोरे, संदीप नाईक, विनोद घोसाळकर, ॲड.आशिष जयस्वाल, श्री.विजयराज शिंदे, डॉ.बालाजी किणीकर, श्री.नाना पटोले, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहर व उपनगरातील सुमारे २० हजार इमारतींना डीम्ड कन्व्हेयन्स नसल्यामुळे धोकादायक अवस्थेत असलेल्या शेकडो इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याची माहे जून, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आलेली अत्यंत गंभीर माहिती, ज्या जागेवर इमारती उभ्या आहेत त्या जागेचे मालक व विकासकांमुळे इमारतींची डीम्ड कन्व्हेयन्स करण्याची हजारो प्रकरणे प्रलंबित अवस्थेत असणे, डीम्ड कन्व्हेयन्स नसल्याने दहिसरमधील पियूष इमारतीला पुनर्विकासामध्ये अडथळा येत असतानाच सदरची इमारत दिनांक २२ जून, २०१३ रोजी कोसळून घडलेली गंभीर दुर्घटना, त्यामध्ये अनेक रहिवाशांचा झालेला मृत्यू, अशा प्रकारच्या हजारो इमारती कन्व्हेयन्सच्या प्रतिक्षेत असल्याने रहिवाशांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असणे, अशा इमारतींच्या पुनर्विकासासाठी शासकीय पातळीवर धोरणात्मक कार्यवाही केली जावी याकरिता लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, आयुक्त, मुंबई महापालिका यांचेकडे दिनांक ४ जुलै, २०१३ रोजी वा त्यासुमारास वारंवार मागणी केलेली असतानाही सदर गंभीर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यात होत असलेली दिरंगाई, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी मुंबईतील लक्षावधी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र

असंतोष, डीम्ड कन्व्हेयन्स अभावी पुनर्विकास रखडलेल्या हजारो इमारतींना डीम्ड कन्व्हेयन्स देऊन त्यांच्या पुनर्विकासासंदर्भात युध्दपातळीवर निर्णय घेऊन उपाययोजना करणे गरजेचे असतानाही आवश्यक ती कार्यवाही करण्यात प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका."

(२) **सर्वश्री प्रकाश भोईर,** रमेश पाटील, शिशिर शिंदे, ॲड.उत्तमराव ढिकले, सर्वश्री वसंत गिते, बाळा नांदगांवकर, सुधाकर देशमुख, देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, मंगेश सांगळे, प्रविण दरेकर, सुधीर मुनगंटीवार, डॉ.खुशाल बोपचे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मेघालयातील सीएमजे तसेच शिलाँग या विद्यापीठातून पीएचडीची पदवी धारण केलेले शेकडो पदवीधारक गत १० वर्षांपासून राज्यातील विविध तंत्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये अध्यापनाचे कार्य करीत असणे, राज्यात तब्बल ४०० ते ६०० बनावट पीएचडीधारक असून त्यांनी राज्य शासनाकडून मिळणाऱ्या सर्व सोयीसुविधा तसेच वेतन घेणे, मेघालयातील सीएमजे विद्यापीठाकडून १ ते ४ लाख रुपये घेऊन बनावट पीएचडी पदवी देण्याचे उघडकीस आलेले प्रकार, यामुळे बनावट पीएचडी पदवी धारकांचा राज्यातील विविध तंत्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये सुरु असलेला सुळसुळाट, या प्रकरणी राज्य शासनाने सीएमजे या विद्यापीठाची बनावट पीएचडी पदवी धारण करणाऱ्या सर्व प्राध्यापकांविरुद्ध विनाविलंब कारवाई करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री सुधाकर देशमुख,** देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, जितेंद्र आव्हाड, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, बापूसाहेब पठारे, किसन कथोरे, कृषिभूषण साहेबराव पाटील, नानाजी शामकुळे, विजय घोडमारे, डॉ.खुशाल बोपचे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नागपूरसह बुलढाणा, वर्धा, जालना, धुळे आणि नंदुरबार या जिल्हा बँका अडचणीत येणे, या जिल्हा बँकांना बँकींग परवाना मिळविण्यास होत असलेली अडचण, बँकींग परवाना मिळविण्यासाठी शासनाने या बँकांना मदत करण्याची आवश्यकता, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक डबघाईस आल्याने शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यात न येणे, शेतीची कामे सुरु होऊनही कर्ज वाटपाची शक्यता नसल्याने शेतकऱ्यांची निराशा होणे, राज्य शासनाकडून राज्य सहकारी बँकांना हमी मिळत नसल्याने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देऊ न शकणे, सन २०१२ या वर्षाच्या तुलनेत अतिशय अल्प कर्ज वाटप होणे, शासनाच्या या धोरणामुळे हजारो शेतकरी हवालदिल होणे, जिल्हा सहकारी बँकांवर रिझर्व्ह बँकेने निर्बंध घातल्याने शासनाने इतर राष्ट्रीयकृत बँकांना शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाचे आदेश देणे, परंतु या बँकांकडून कर्ज वितरीत करण्यास होत असलेली टाळाटाळ, ऐन हंगामाच्या काळात शेतकरी अडचणीत आल्याने सावकाराकडे मदत मागण्याशिवाय पर्याय नसणे, शेतकऱ्यांना कर्जाच्या खाईत लोटणाऱ्या सावकारांविरोधी कायद्यास अद्यापही मंजुरी न मिळणे, सावकारी कायद्यात त्रुटी असल्यानेच कायदा मंजूर होण्यास विलंब होणे, या जिल्हा बँकांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

सात : **ॲड.सदाशिवराव पाटील, सर्वश्री बाळासाहेब पाटील, सुभाष झनक, सुरेश लाड, विजय वडेट्टीवार, कृषीभूषण साहेबराव पाटील, डॉ.नामदेव उसेंडी, सर्वश्री रावसाहेब अंतापूरकर, आनंदराव गेडाम, दिपक आत्राम, दिनानाथ पडोळे, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव:-**

" राज्यात रस्त्याच्या दुरुस्तीसाठी कोट्यावधी रुपये खर्च करण्यात येऊनही रस्त्यांची दुरावस्था कायमच असल्याचे आढळून येणे, राज्यातील शहरांमध्ये व खेडयापाडयामध्ये रस्त्यांची तीच अवस्था झालेली आढळून येणे, महाराष्ट्रातील दुर्गम व डोंगराळ भागात खेडेगावापासून शाळा, दवाखाने आदी सुविधा लहान ओढे, नदया, नाले यामुळे विभागल्या गेल्या असल्याने पावसाळयात अशा भागात दळणवळणाचा प्रश्न उभा रहात असल्यामुळे अशा ठिकाणी शासनाने साकव म्हणजे उंच पातळीवरील पादचारी पूल बांधण्याची आवश्यकता, पूरहानी किंवा जास्त पावसामुळे पुलांचे जोडरस्ते काही प्रमाणात किंवा संपूर्णपणे वाहून जाणे, राज्यातील शहरात दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असणे, या शहरात उड्डाण पुलांची आवश्यकता असणे, ज्या शहरात उड्डाण पुलांची कामे सुरु आहेत ती अर्धवटरित्या केलेली असणे, त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होणे, सदर उड्डाण पुलांचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असतानाही रस्त्यांची दुरुस्ती योग्य प्रकारे होत नसणे, त्यामुळे वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होऊन अनेक वेळा लहानमोठे अपघात होऊन त्यात अनेक व्यक्ती नाहक मृत्यू पडत असून अनेक व्यक्ती जखमी होत असल्याचे आढळून येणे, जखमींना त्वरित उपचार मिळण्यासाठी महामार्गावर ट्रॉमा केअर हॉस्पिटल निर्माण करणे आवश्यक असून राज्यातील राष्ट्रीय महामार्गावरील जरुर त्या ठिकाणी रस्त्याचे चौपदरीकरण करणे, वळणांचे चढ सुलभ करणे, अरुंद पूल व मोऱ्या रुंद करणे, कमकुवत पूल व मोऱ्या यांची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता, घाटावरील नागमोडी वळणांमुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने नागमोडी वळणांचे रुंदीकरण करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व जिल्ह्यांतील रस्त्यांची दुरावस्था सुधारुन परिपूर्ण व सुसज्ज रस्ते निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही, तसेच राज्यातील विविध ठिकाणच्या राष्ट्रीय महामार्गावर, इतर महामार्गावर तसेच विविध रस्त्यांवर होत असलेल्या भीषण अपघातांना आळा घालण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. "

आठ : **शासकीय विधेयके :-**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

**(१)** सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३.

(क) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, दादाराव केचे, अतुल देशकर, विजयकुमार देशमुख, संजय राठोड, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, प्रकाश महेता, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अनिल राठोड, विजय शिवतारे, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष देसाई, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ड) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ढ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री बबनराव घोलप, धनराज महाले, दादाजी भुसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ण) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथ शिंदे, प्रताप सरनाईक, दौलत दरोडा, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(त) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजयराज शिंदे, ॲड.आशिष जयस्वाल, डॉ.संजय रायमुलकर, श्री.संजय गावंडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(थ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, श्री. धैर्यशील पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री देवेंद्र फडणवीस, महादेव बाबर, एकनाथराव खडसे (पाटील), सुभाष देसाई, सुधीर मुनगंटीवार, सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक ८ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१३ नापसंत करते."

(ख) **सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष देसाई, वि.स.स. यांचा प्रस्ताव:-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(१) श्री. सरदार तारासिंग, वि.स.स.**

**"चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राला पुरवठा करण्यात येणाऱ्या कोळशाच्या देखरेखीसाठी नेमण्यात आलेली एजन्सी"** या विषयावरील **श्री.नानाजी शामकुळे व इतर वि.स.स.** यांचा दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५२५ मधील प्रश्न क्रमांक ६२००१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री.सुधाकर देशमुख, वि.स.स.**

**" वन विभागातील आदिवासी लाभार्थ्यांना उत्पादन आणि बांबू प्रक्रिया राबविण्यात येत असलेले प्रकल्प"** या विषयावरील **श्री.राजकुमार बडोळे, वि.स.स.** यांचा दिनांक १८ एप्रिल, २०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५५१ मधील प्रश्न क्रमांक ८९६७२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १५ जुलै, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.